महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द
तालुका - आंबेगाव, जिल्हा - पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३-२३०५८२ संकेतस्थळ : www.gcoeara.ac.in
ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र.शाअसंमअ/विवि/२०२२/6683 दिनांक - 02 DEC 2022

## <u>परीपत्रक</u>
## <u>अंतिम मुदत</u>

विषय - डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने मधील शै.वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबत.

संदर्भ- १.जा.क्र.तंशिविकापु/विवि/महाडिबीटी-वसतीगृह २०२१-२२/२०२२/५३८४ दि.१८/११/२०२२.
२. जा.क्र.शाअसंमअ/विवि/२०२२/६४३२ दि.२१/११/२२

शै.वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने मधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज महाडिबीटी पोर्टल वर भरले होते. सदर अर्जामध्ये शासकिय वसतिगृह तसेच खाजगी वसतिगृह मध्ये राहत असल्याचे कागदपत्र जोडुन अर्ज सादर केले होते. तथापी सदर अर्ज विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रादवारे मंजुरी करीता या महाविद्यालयाकडुन वरीष्ठ कार्यालयात पाठविण्यात आले होते.

परंतु आता वरीष्ठ कार्यलयाकडुन संबधित विद्यार्थ्यांनी जोडलेले वसतिगृह संबधित विद्यार्थी प्रत्यक्ष किती महिने वसतिगृहामध्ये वास्तव्यास होते या बाबत माहिती ऑनलाईन भरून मागविलेली आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांनी मागील व चालु वर्षी (शै.वर्ष २०२०-२१ व २०२१-२२) महाडिबीटी वर ऑनलाईन अर्ज भरले आहे अश्या सर्व विद्यार्थ्यांनी दि.२३/११/२०२२ रोजी पुर्वी तात्काळ वसतिगृहाचे कागदपत्रे तसेच प्रत्यक्ष किती महिने वसतिगृहात वास्तव्यास आहे याचे लेखी हमीपत्र (साध्या कागदावर स्वत: च्या स्वाक्षरी सह) विद्यार्थी विभागात जमा करावे जेणेकरुन विहीत मुदतीत सदर माहीती वरीष्ठ कार्यालयास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**तथापी असे निदर्शनसास आले आहे कि अद्याप काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्वाक्षरी चे अर्ज विद्यार्थी विभागात घेवुन आलेले नाहीत त्यामुळे त्यांच डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेचे अर्ज क्लर्क लॉगीन मध्ये दिसुन येत आहे. तरी संबधित विद्यार्थ्यांना अंतिम मुदत म्हणुन दि.०३/१२/२०२२ रोजी पर्यंत देण्यात येत आहे. तदनंतर जे विद्यार्थी त्यांचे वसतिगृहाचे कागदपत्रे तसेच प्रत्यक्ष किती महिने वसतिगृहात वास्तव्यास आहे याचे लेखी हमीपत्र (साध्या कागदावर स्वत: च्या स्वाक्षरी सह) देणार नाही त्यांची स्कॉलरशिप मंजुर न झाल्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

02-12-22
प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ,ता. आंबेगाव, जि. पुणे.

प्रत- १. सर्व विभागप्रमुख यांनी सदर परीपत्रक विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणुन द्यावी. यंत्र, अणुविद्युत , स्थापत्य, उपकरणीकरण , स्वयंचल, संगणक.

२. सर्वसाधारण सुचना फलक.